महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

रविवार ◆ २१ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०८९ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## थोडक्यात बातम्या

### नवरात्रीसाठी बाजारपेठेत भेटवस्तूंचा साज

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : नवरात्रीमध्ये दुर्गा देवीच्या नऊ रूपांची पूजा करणे विशेष शुभ मानले जाते. यासोबतच नवरात्रीच्या अष्टमी किंवा नवमी तिथीला मुलींची पूजा करण्याची विशेष परंपरा आहे. माता राणीची भक्तिभावाने पूजा करून कन्या पूजा केल्याने माता आपल्या भक्तांवर सदैव कृपा करून सर्व इच्छा पूर्ण करते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. या अनुषंगाने ठाण्यातील बाजारपेठेत विविध शैक्षणिक, खेळ, खाद्य पदार्थ, कानातले, मोत्याच्या माळी, हेयर क्लिप, हेयर बैंड, रुमाल, मेकअप किट इत्यादी भेटवस्तू कन्या पूजनासाठी उपलब्ध झाल्या आहेत. दरम्यान, या आकर्षक वस्तूंच्या खरेदीसाठी भाविक गर्दी करीत आहेत.

### १४ गावांना सर्व सुविधा द्या

#### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : सर्वपक्षीय विकास समितीच्या कार्याला मोठं यश प्राप्त झालं असून नवी मुंबई पालिकेत समाविष्ठ 14 गावांना पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा, शाळेच्या कामांना तातडीने प्राधान्य आदी सर्व सुविधा देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथिगृहात पार पडलेल्या बैठकीत दिले आहेत. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, नवी मुंबईचे आयुक्त कैलास शिंदे, प्रधान सचिव, ठाणे कलेक्टर आदी मान्यवरांसह समितीचे सर्व पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. 14 गावांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सतत झटणाऱ्या सर्व पक्ष विकास समितीने नवी मुंबई महानगरपालिकेची मागणी केली. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जीआर पारित केला. त्यानंतर काही निधी संदर्भात अडचणी आली असता पुन्हा समितीने पत्रव्यवहार करून नगर विकास मंत्री व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्याकडे निधीची मागणी केली व त्याचा पाठपुरावा करत होती. हा पाठपुरावा करत असताना खासदार श्रीकांत शिंदे व आमदार राजेश मोरे यांनी देखील 14 गावांच्या विकासासाठी कंबर कसली आणि त्यांनी देखील एकनाथ शिंदे यांची बैठक घेण्याकरता प्रयत्न केले. त्या पाठपुराव्याला यश म्हणून, समितीला पत्र पाठवून नगर विकास खात्याकडून सह्याद्री अतिथीगृह मलबार हिल येथे बैठकीला आमंत्रित केले. त्या बैठकीत 14 गावाच्या विकासासंदर्भात महापालिकेच्या वतीने. रस्ते गटर लाईट पाणी आरोग्य यासंदर्भात लवकरात लवकर सुविधा चालू करण्याच्या आदेश एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई आयुक्तांना दिले. यावर या सर्व कामांचे टेंडर देखील तयार केल्याचे आयुक्त कैलास शिंदे यांनी सांगितले. त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील तात्काळ महापालिकेला 70 कोटी रुपये वर्ग करण्याचे आदेश सचिवांना दिले.

# मुंबई, ठाण्यात बुलेट ट्रेन कधी धावणार ?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. असे असले तरी हा प्रकल्प प्रत्यक्षात केव्हा सुरू होणार, याविषयीची नागरिकांमध्ये उत्सुकता आहे. त्यावर केंद्रीय रेल्वे, माहिती व प्रसारण तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रकल्प कोणत्या वर्षी सुरू होणार, याची सविस्तर माहिती पत्रकारांशी बोलताना दिली.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील शिळफाटा बोगद्याच्या ब्रेकथ्रू कार्यक्रम शनिवारी केंद्रीय रेल्वे, माहिती व प्रसारण तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते पार पडला. नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (NHSRCL) तर्फे घणसोली येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी मंत्री वैष्णव यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

मुंबई, ठाण्यात बुलेट ट्रेन कधी धावणार

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे ९ तासांचा प्रवास २ तासांवर येणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे मुंबई महानगर प्रदेशातील अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. तसेच या प्रकल्पाचे पहिल्या टप्प्यातील काम २०२७ मध्ये पूर्ण होणार आहे तर, त्यांच्या पुढच्या टप्प्यात म्हणजेच २०२८ मध्ये ठाणे आणि त्यानंतर २०२९ मध्ये मुंबईत बुलेट ट्रेन धावेल, अशी माहिती मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.



# शहापुरात मतदार यादीतील दुबार नावांचा होणार सर्व्हे

## घरोघरी होणार काटेकोर तपासणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोळखांब** : शहापूर तालुका हा भौगोलिकदृष्टया अतिशय दुर्गम व डोंगराळ तालुका असून दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला मोठा तालुका आहे. येथील निवडणूक विभागाच्या मतदार याद्यांमध्ये मोठ्याप्रमाणात घोळ दिसत असून येत्या काही दिवसातच प्रत्यक्ष जागेवर जाऊन दुबार मतदारांचा सर्व्हे होणार असल्याचे तालुका निवडणूक विभागाकडून सांगितले जाते.

2011 च्या जनगणनेनुसार 3 लाख 34 हजार येवढी लोकसंख्या आहे. तर वाडा तालुक्यातील 50 हजार मतदार वगळता 2 लाख 76 हजार एवढी मतदार संख्या आहे. या मध्ये ग्रामपंचायत, पं. स., जि. प, इतर स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, लोकसभा निवडणुकीत



18 वर्षावरील मतदारांची नोंदणी प्रक्रिया सुरू असते. ही नोंदणी मोठ्या प्रमाणात होते. अशा वेळी प्रत्येक निवडणुकीत बोगस मतदानाचे प्रमाणही तितकेच मोठे असते.

यामध्ये बोगस, खोटे, मयत व्यक्ती, तसेच एकाच व्यक्तीची तालुक्यात दोन दोन ठिकाणी आणी इतर ठिकाणच्या मतदार याद्यांमध्ये नावे समाविष्ट असतात. यापैकी 326 पुलिंगवर हे प्रकार सर्रास सुरू असतात. मात्र याबाबत कुणी तोंड उघडायला तयार नाहीत.

अशा परिस्थितीत या सर्व प्रकाराबाबत तालुक्यातील 110 ग्रामपंचायत तसेच 15 जि.प.गट.30 पं.स. गणामध्ये प्रत्यक्ष जागेवर जाऊन घरटी तपासणी केली जाणार असून सदरील मतदार एकदा दोनदा मूळ पत्यावर आढळून आला नाही, तर त्याचे नाव तेथील मतदार यादीतून रद्द केले जाईल किंवा इतर ठिकाणच्या अथवा इतर तालुक्याचे मतदार यादीतील नाव बाद केले जाणार असल्याची माहिती हाती आली आहे.

### बोगस मतदारांचा आकडा कमी करणार

मागील वर्षी देखील तालुक्यातील मतदार यादीप्रमाणे स्थळ पाहणी करून तसेच इतर नागरिकांच्या तक्रारीवरून सर्व्हे करून अंदाजे एक हजार बोगस मतदारांची नावे यादीतून कमी करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात बोगस मतदारांचा आकडा तालुक्यात मोठा असल्याने यावेळी अतिशय काटेकोरपणे सर्व्हे करून जास्तीत जास्त बोगस मतदारांचा आकडा कमी करण्याचा मानस निवडणूक विभागाने व्यक्त केला आहे.

### बोगस मतदान निकाली निघणार...

बऱ्याच वेळा नगरपंचायत, ग्रामपंचायत, किंवा इतर मतदानाचे वेळी बाहेरील आयात बोगस मतदारांकडून मर्जीतील उमद्वारांना मतदान करायला लावून काही विशिष्ट नेते मंडळींना त्याचा चांगलाच फायदा होत असल्याचे निदर्शनास येत असते. त्यामुळे भविष्यात लोकशाही धोक्यात येऊ नये म्हणून निवडणूक विभागाने प्रामाणिक व काटेकोरपणे सर्व्हे करून बोगस मतदान निकाली काढण्याचे पवित्र काम करणे गरजेचे मानले जाते.

# पुनर्विकास रखडविणाऱ्या विकासकाचीच एस.आर.ए प्रकल्पासाठी निवड

## ठाणे नळपाड्यातील रहिवाशांची भूमिका

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : सात ते आठ वर्षांपासून पुनर्विकास रखडविणाऱ्या विकासकाचीच एस.आर.ए प्रकल्पासाठी निवड करण्यात आली असल्याने प्रशासनाने लादलेला विकासक आम्हाला नको, आमचा विकास आम्हीच करणार अशी भूमिका नळपाड्यातील रहिवाशांनी घेतली आहे. यासाठी नळपाडा रहिवासी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याचा निर्णय देखील या सर्व रहिवाशांनी घेतला आहे. रहिवाशांच्या या भूमिकेमुळे प्रकल्प राबवण्या संदर्भातील विकासकाच्या अडचणी मात्र वाढल्या आहेत.

नळपाडा येते एस.आर.ए प्रकल्प राबवण्यासाठी गेल्या आठवड्यात या झोपड्यांचे बायोमेट्रिक करण्याचा प्रयन्त प्रशासनामार्फत करण्यात आला होता. त्यानंतर दुसऱ्या दिवशी या बायोमेट्रिक सर्व्हेला विरोध करत मोठ्या संख्येने नागरिकांनी एस.आर.ए कार्यालयावर मोर्चा काढला होता. विकासकाची निवड केल्याची माहिती देखील रहिवाशांना नसून पुनर्विकास राखडवणारा विकासक आम्हाला नको अशी भूमिका घेत या रहिवाशांनी संबंधित विकासाला आपला तीव्र विरोध दर्शवला आहे. तर यासंदर्भात एक महत्वाची बैठकही गुरुवारी रहिवाशांच्या वतीने घेण्यात आली.यामध्ये विकासाला विरोध दर्शवत आपला विकास आपणच करणार, यासाठी विकासकाची निवड देखील आपणच करणार असल्याची भूमिका रहिवाशांनी घेतली. तर यासाठी नळपाडा रहिवासी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला असल्याची माहिती रहिवाशांनी दिली आहे.

सुभाषनगर, गांधीनगर परिसराचा सात ते आठ वर्षांपासून पुनर्विकास रखडविणाऱ्या बिल्डरचीच विकासासाठी निवड झाल्यामुळे नागरिकांनी चिंता व्यक्त केली. तसेच सर्वेक्षणाला तीन महिन्यांची स्थगिती देण्याची मोर्चेकऱ्यांकडून मागणी करण्यात आली होती. मात्र, त्याला एसआरएच्या अधिकाऱ्यांनी ठाम नकार दिला होता. या संस्थांचे पदाधिकारी व सदस्य कोण आहेत, याबाबत रहिवाशांमध्ये संभ्रमावस्था आहे.

नळपाडा झोपडपट्टीतील अनेक कुटुंबे नोकरी-व्यवसायानिमित्ताने मूळ ठिकाणाऐवजी अन्य ठिकाणी तात्पुरती स्थलांतरित झाली आहेत. तर झोपडपट्टीतील अनेक कुटुंबांना घराचा पुरावा सादर करण्यासाठी पुरेसा वेळ मिळालेला नाही. झोपडपट्टीतील काही कुटुंबांनी आपली घरे भाड्याने दिली आहेत. त्यामुळे मूळ घरमालकांपर्यंत माहिती पोचलेली नाही, याकडे रहिवाशांकडून लक्ष वेधण्यात येत आहे.

# ६५ इमारतींमधील रहिवाशांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार

## अनधिकृत इमारतीत राहणाऱ्या रहिवाश्यांना दिलासा देण्यासाठी कायदेशीर तोडगा काढण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : डोंबिवलीतील ६५ अनधिकृत इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांची फसवणूक करणाऱ्या विकासक आणि त्यांच्याशी संलग्न असलेले सर्व व्यवहारांचा तपास करून यातील सर्वांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. तसेच या प्रकरणात नागरिकांची फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासाठी पालिकेने आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे तक्रार करून गुन्हे दाखल करावे असे निर्देश शिंदे यांनी कल्याण डोंबिवली मनपा आयुक्तांना दिले.

कल्याण - डोंबिवली महापालिका क्षेत्रातील ६५ इमारती उच्च न्यायालयाने अनधिकृत ठरविण्यात आल्या आहेत. यातील रहिवाशांची संबंधीत विकासकाकडून फसवणूक झाली असल्याने आज हजारो कुटुंब बेघर होण्याच्या छायेत आहेत. तर न्यायालयाकडून या इमारती निष्कासित करण्याचे आदेश देण्यात आले आहे. मात्र असे झाल्यास काही हजार कुटुंब बेघर होतील. याच पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक पार पडली. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, महाराष्ट्र नगर विकास विभाग प्रधान सचिव तथा अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्यासह नितीन पाटील, रवी पाटील, रंजीत जोशी, दिपेश म्हात्रे, संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

अनधिकृत बांधकाम प्रकरणातील नागरिकांना न्यायलायीन निर्णयाच्या अधीन राहून कशा पद्धतीने दिलासा देता येईल याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच या प्रकरणात नागरिकांची फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासाठी पालिकेने आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे तक्रार करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावे असे निर्देश यावेळी शिंदे यांनी दिले. तसेच भविष्यात या पद्धतीने पुन्हा इतर नागरिकांची फसवणूक होऊ नये यासाठी योग्य पद्धतीने जनजागृती करावी असेही शिंदे यांनी यावेळी सांगितले. यासाठी महापालिकेच्या माध्यमातून जनजागृती करणारे फलक शहरात जागोजागी लावावे. तसेच पालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावरून नियमित स्वरूपात अधिकृत इमारतीची यादी प्रसिद्ध करण्यात यावी. यामुळे नागरिकांना योग्य माहिती मिळण्यास मोठी मदत होईल असेही शिंदे यांनी सांगितले.

# लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांनी केवायसी करा

## राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील सर्व लाभार्थ्यांना मिळणारे हप्ते अधिक सुलभ, सुकर व पारदर्शक व्हावेत यासाठी केवायसी प्रक्रिया पूर्ण करावे, असे आवाहन महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केले आहे.

मुख्यमंत्री-लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांनी येत्या दोन महिन्यांत अधिकृत संकेतस्थळावर जाऊन केवायसी करणे बंधनकारक असून, यासाठी ladkibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळाचा वापर करावा असेही त्यांनी सांगितले. या माध्यमातून लाडक्या बहिणींना योजनेंतर्गत लाभ वेळेत व अचूक मिळण्यास मदत होणार आहे.

या केवायसीमुळे महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या इतर योजनांचा लाभही प्रत्येक पात्र महिलांपर्यंत पारदर्शकपणे मिळणार असल्याचे राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगितले.








# जागतिक स्वच्छता दिन : समाजपरिवर्तनाचा शाश्वत मार्ग

डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२

मानव समाजाचा विकास केवळ तांत्रिक प्रगतीवर, औद्योगिक उन्नतीवर किंवा भौतिक सुखसुविधांच्या उपलब्धतेवर होत नाही, तर त्यामागे एक महत्त्वाचा पाया असतो आणि तो म्हणजे स्वच्छता होय. स्वच्छतेशिवाय आरोग्य, आरोग्याशिवाय श्रमशक्ती, श्रमशक्तीशिवाय उत्पादन आणि उत्पादनाशिवाय समाजाची प्रगती अशक्य आहे. म्हणूनच इतिहासापासून आधुनिक काळापर्यंत जगातील सर्व समाजांमध्ये स्वच्छतेला सामाजिक मूल्य, नैतिक कर्तव्य आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग मानले गेले आहे. मात्र विसाव्या शतकानंतर झालेल्या औद्योगिकीकरणाने, वेगवान शहरीकरणाने आणि उपभोक्तावादी संस्कृतीने जगासमोर कचऱ्याचे व्यवस्थापन, पाण्याचे प्रदूषण, वायुप्रदूषण आणि जमिनीची धोकादायक नासाडी असे प्रश्न उभे केले आहेत. याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र महासभेने दि. ८ डिसेंबर २०२३ रोजी ठराव क्र. A/RES/78/122 मंजूर करून दरवर्षी २० सप्टेंबर हा जागतिक स्वच्छता दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला.

जागतिक स्वच्छता दिन हा दिवस फक्त कचरा गोळा करण्याचा दिवस नाही, तर तो समाजातील प्रत्येक घटकाला, प्रत्येक नागरिकाला आणि प्रत्येक राष्ट्राला सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देतो. स्वच्छता ही आरोग्याची पायरी आहे, परंतु तिच्या पुढे सामाजिक न्याय, समता, पर्यावरणीय संरक्षण आणि आर्थिक समृद्धीचेही आयाम दडलेले आहेत. त्यामुळेच या दिवसाचे समाजशास्त्रीय महत्त्व अधोरेखित होते.

स्वच्छतेचा समाजशास्त्रीय अभ्यास केला, तर दिसते की समाजातील वेगवेगळ्या गटांमध्ये स्वच्छतेच्या संकल्पना भिन्न असतात. ग्रामीण समाजातील लोक स्वच्छतेला पारंपरिक परंपरांशी जोडतात, जसे की दररोज अंगण झाडणे, शौचालयात जाऊन आल्यानंतर हातपाय धुणे, घरातील पवित्रता राखणे. शहरी समाज मात्र आधुनिक साधनसामग्रीच्या मदतीने कचरा व्यवस्थापन करतो, परंतु प्लास्टिकच्या अतिरेकी वापरामुळे शहरातील प्रदूषणाची समस्या अधिक तीव्र झाली आहे. एका गटाची अस्वच्छता दुसऱ्या गटावर आघात करते, उदा. शहरातील नाले गावाकडे वाहून जातात आणि तेथील पिण्याचे पाणी दूषित करतात. यावरून स्वच्छतेचा प्रश्न केवळ वैयक्तिक नसून सामूहिक आहे, हे स्पष्ट होते.

समाजातील असमानता आणि स्वच्छता यांचे नातेही महत्त्वाचे आहे. गरीब वस्त्यांमध्ये राहणारे लोक सुरक्षित, स्वच्छ पाणी व शौचालयाच्या सुविधांपासून वंचित असतात. अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांवर त्यांना मोठा खर्च करावा लागतो, परिणामी दारिद्र्य अधिक वाढते. उलट, सधन वर्ग आरोग्यसुविधा परवडल्यामुळे या संकटापासून वाचतो. म्हणूनच स्वच्छतेचा प्रश्न हा सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. जागतिक स्वच्छता दिन या असमानतेकडे जगाचे लक्ष वेधतो आणि सर्वांना समान आरोग्यदायी वातावरण मिळवून देण्याचे आवाहन करतो.

आरोग्य आणि स्वच्छतेचे नाते तर अविभाज्यच आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार दरवर्षी लाखो लोक दूषित पाणी आणि अस्वच्छतेमुळे होणाऱ्या रोगांमुळे मृत्यूमुखी पडतात. भारतातही डेंग्यू, मलेरिया, कॉलरा अशा साथरोगांचा प्रसार अस्वच्छतेमुळे होतो. भारतात 'स्वच्छ भारत अभियान' या राष्ट्रीय उपक्रमाने खुले शौचालय निर्मूलन आणि कचरा व्यवस्थापनात लक्षणीय प्रगती साधली असली, तरीही भारतीय लोकांच्या मानसिकतेत बदल घडवण्याचे कार्य अद्याप अपूर्ण आहे. स्वच्छतेला जीवनशैलीत सामावून घेणे ही खरी आवश्यकता आहे.

पर्यावरणीय दृष्टिकोनातून पाहिले, तर कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न जगासमोर भयानक रूपात उभा आहे. प्लास्टिकच्या प्रदूषणाने समुद्री प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. औद्योगिक सांडपाण्यामुळे नद्या आणि तलावांचे पाणी विषारी झाले आहे. जंगलात पडणाऱ्या घनकचऱ्यामुळे जैवविविधता नष्ट होत आहे. हवामान बदलाचे वेगाने वाढणारे प्रमाणही कचरा व्यवस्थापनातील त्रुटींशी निगडित आहे. अशा परिस्थितीत जागतिक स्वच्छता दिन हा केवळ स्वच्छतेचा नव्हे, तर पर्यावरण वाचविण्याचा दिवस म्हणून पाहिला पाहिजे.

स्वच्छतेचा आर्थिक परिणाम देखील तितकाच महत्त्वाचा आहे. अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांवर मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक व खाजगी खर्च होतो. कामगारशक्ती आजारी पडल्यामुळे उत्पादनक्षमता घटते. पर्यटनाच्या दृष्टीने स्वच्छ शहरं व खेडी हे नेहमीच आकर्षण ठरतात. स्वच्छता राखणारी गावे व जिल्हे हे विकासाच्या दिशेने वेगाने प्रगती करतात. म्हणूनच आर्थिक प्रगतीसाठी स्वच्छतेचे भांडवल म्हणून पाहिले पाहिजे.

संस्कृती आणि स्वच्छता यांचे नाते भारतीय समाजासाठी विशेष आहे. आपल्या धार्मिक परंपरांमध्ये स्वच्छतेला पवित्रतेचे रूप दिले गेले आहे. धार्मिक स्थळे, घरे, अंगणे स्वच्छ ठेवणे हे धार्मिक कर्तव्य मानले गेले. परंतु आज या परंपरांचा लोप होत आहे. उत्सवांमध्ये निर्माल्य, प्लास्टिक सजावट यामुळे नद्या व तळी प्रदूषित होतात. त्यामुळे स्वच्छतेची खरी परंपरा नव्या पिढीला समजावून सांगणे व ती आधुनिक जीवनशैलीशी जुळवून घेणे अत्यावश्यक आहे.

स्वच्छतेची खरी चळवळ लोकसभाणातनच यशस्वी होऊ शकते. सरकारने कितीही योजना आखल्या तरी नागरिकांचा सहभाग नसेल, तर त्या योजनांना यश Copy कोण आहे. शाळांमधील विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, स्थानिक ग्रामपंचायती या सर्वांचा सहभाग स्वच्छता चळवळीला उर्जा देतो. त्याचबरोबर कचरा गोळा करणाऱ्या कामगारांचे योगदान विसरून चालणार नाही. त्यांच्या श्रमांमुळेच शहरं व गावं स्वच्छ राहतात. त्यांना सामाजिक सन्मान व सुरक्षितता देणे ही समाजाची जबाबदारी आहे.

स्वच्छतेचा प्रश्न हा जागतिक विकास उद्दिष्टांशी थेट संबंधित आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने ठरवलेले आणि १ जानेवारी २०१६ रोजी लागू केलेले १७ शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) स्वच्छतेशिवाय साध्य होऊ शकत नाहीत. ही उद्दिष्टे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय स्थिरता साधण्यासाठी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारतात. गरिबी निर्मूलन, चांगले आरोग्य, लिंगसमता, शाश्वत शहरे, हवामान कृती, स्वच्छ पाणी व स्वच्छता या सर्व ध्येयांचा पाया स्वच्छतेवरच आहे. त्यामुळे जागतिक स्वच्छता दिन हा प्रत्यक्षात शाश्वत विकासाच्या अजेंड्याला गती देणारा दिवस आहे.

या सर्व विवेचनावरून असे स्पष्ट होते की जागतिक स्वच्छता दिन हा फक्त एका दिवसापुरता प्रतीकात्मक कार्यक्रम नाही, तर तो सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि सांस्कृतिक बदल घडवण्याचे साधन आहे. २० सप्टेंबरचा हा दिवस प्रत्येकाला स्वतःच्या जबाबदाऱ्यांची आठवण करून देतो. आपल्या घरापासून ते शाळा, रस्ते, समाज, गाव, शहर आणि शेवटी राष्ट्र व जग या सर्व स्तरांवर स्वच्छतेची चळवळ रुजली, तरच समाज परिवर्तन शक्य आहे.

आज गरज आहे ती केवळ कचरा उचलण्याची नाही, तर मानसिकतेत बदल घडवण्याची. 'माझ्या एका कृतीने काय फरक पडणार?' ही संकुचित मानसिकता मोडून 'मी बदललो तर समाज बदलेल' ही जाणीव मनोमन स्वीकारणे ही खरी स्वच्छतेची सुरुवात आहे. जागतिक स्वच्छता दिन हाच संदेश देतो की स्वच्छता ही व्यक्तीगत सवय नसून सामूहिक संस्कृती आहे.

शेवटी, जागतिक स्वच्छता दिन आपल्याला सांगतो की स्वच्छता म्हणजे आरोग्य, पर्यावरण, अर्थकारण, सामाजिक समता आणि सांस्कृतिक मूल्ये यांचा संगम आहे. २० सप्टेंबरचा हा दिवस आपण सर्वांनी सामूहिक जबाबदारीचा दिवस म्हणून पाळला, तर तो समाजपरिवर्तनाचा पाया ठरेल. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेला जीवनशैलीत सामावून घेतले, तरच हा दिवस खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल.

## जीवनदीप महाविद्यालयातील
# विद्यार्थिनी प्रणिता वाघमारे सेट परीक्षेत उत्तीर्ण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

जीवनदीप महाविद्यालयाच्या पदव्युत्तर इतिहास विभागातील द्वितीय वर्षात शिक्षण घेत असलेली विद्यार्थिनी कु. प्रणिता वाघमारे हिने जून २०२५ मध्ये झालेल्या सेट परीक्षेत यश संपादन करून महाविद्यालयाचा गौरव वाढविला आहे.

या यशाबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे, संचालक श्री. प्रशांत घोडविंदे, प्राचार्य डॉ. अशोक डी. वाघ, उपप्राचार्य प्रा. हरेंद्र सोष्टे, इतिहास विभाग प्रमुख प्रा. राजाराम कापडी तसेच प्रा. कविता काटकर यांनी तिचा सत्कार करून अभिनंदनपर शुभेच्छा दिल्या.

कु. वाघमारे हिने सातत्यपूर्ण मेहनत, चिकाटी आणि अभ्यासू वृत्ती यांच्या जोरावर हे यश संपादन केले असून या यशामागे इतिहास विभाग प्रमुख प्रा. राजाराम कापडी व प्रा. कविता काटकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

बी या उल्लेखनीय यशामुळे जीवनदीप महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर वर्गाने तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले तसेच तिच्या पुढील उच्च शिक्षण व भावी कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या.

# केडीएमसीच्या अत्रे नाट्यगृहात मुदत संपलेल्या कोल्ड्रिंकची विक्री

**संबंधितांवर कारवाई करण्याची नागरिकांची मागणी**



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील आचार्य प्रल्हाद केशव अत्रे रंगमंदिरात मुदत संपलेल्या कोल्ड्रिंकची विक्री सुरू असल्याचा गंभीर प्रकार नागरिकांनी उघडकीस आणला आहे. या सर्व प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून याबद्दल नागरिकांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आचार्य अत्रे रंगमंदिर हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने वादात असते. असाच एक प्रकार काल गुरुवारी एका गुजराथी नाटकादरम्यान नाटकाच्या झालेल्या मध्यंतरा वेळी घडला. नाट्य रसिक कोल्ड्रिंक घेण्यासाठी कॅन्टीन मध्ये गेले असता त्या ठिकाणी एक्सपायरी डेट संपलेल्या कोल्ड्रिंक च्या बॉटल नाट्य रसिकांना देण्यात आल्या. फ्रिजमध्ये देखील असलेल्या बॉटलची देखील एक्सपायरी डेट संपलेली होती. यामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार असल्याचे सांगत नागरिकांनी संताप व्यक्त केला. या घटनेमुळे अत्रे रंग मंदिराच्या व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर आला असून महापालिका प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. याप्रकरणी केडीएमसी प्रशासनाने लक्ष देऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी नागरिक करत आहे.

तर याबाबत अत्रे नाट्यगृहाचे व्यवस्थापक माणिक शिंदे यांना विचारणा केली असता, हि घटना कळताच आपण याठिकाणी आलो. काय झालं आहे याची माहिती घेऊन नागरिकांना शांत रहाण्याचे आवाहन केले. हा प्रकार वरिष्ठांना कळवला. पोलिसांना देखील याबाबत तक्रार दिली असून पोलीसांनी जवाब नोंदवला आहे. नाट्यगृहातील उपहार गृहाचा ठेका 5 वर्षांसाठी दिला जातो. हा ठेका देतांना अटीशर्ती दिलेल्या असतात, यांचे पालन करून उपहारगृह चालवायचे असते. या प्रकरणात संबंधित ठेकेदार दोषी आढळल्यास आयुक्तांच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

## कल्याण पूर्वेत स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून
# "माझा कचरा माझी जबाबदारी"चा नागरिकांना संदेश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात "स्वच्छता ही सेवा अभियान" १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येत असून त्याअंतर्गत आज ड प्रभाग परिसरात चक्कीनाका ते बिकानेर बेकरी (मलंग रस्ता) येथे सखोल स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

या मोहिमेस आमदार सुलभा गायकवाड, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर, ड प्रभागाचे सहा. आयुक्त उमेश यमगर, मुख्य स्वच्छता अधिकारी ऑगस्टीन घुटे, स्वच्छता अधिकारी विक्रम गायकवाड, रचना पार्क ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मनोहर देसाई व प्रधान, तसेच ज्येष्ठ नागरिक, चेतना शाळेचे विद्यार्थी, सुमित एल्कोचे आयईसी पथक, अधिकारी-कर्मचारी व इतर मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

महापालिकेच्या स्वच्छता विभागाने या मोहिमेदरम्यान रस्ते व फुटपाथ काटेकोर स्वच्छता, झाडलोट, कचरा गोळा करून योग्य विल्हेवाट या सर्व बाबींवर विशेष भर दिला. नागरिकांना अधिक स्वच्छ व निरोगी वातावरण मिळावे यासाठी कर्मचारी वर्गाने मनापासून मेहनत घेतली. तसेच नागरिकांमध्ये जनजागृतीसाठी "माझा कचरा माझी जबाबदारी" या संकल्पनेवर आधारित पथनाट्यही सादर करण्यात आले. नागरिकांनी दररोज घंटागाडीत कचरा देणे, व्यावसायिकांनी दुकानात कचरा डबे ठेवणे, रस्त्यावर कचरा न टाकणे याबाबत आवाहन करण्यात आले.

महापालिका सातत्याने शहरातील रस्ते व गल्लींची स्वच्छता प्रभावी पद्धतीने राखण्यासाठी कटिबद्ध आहे. स्वच्छता ही केवळ जबाबदारी नसून सामाजिक बांधिलकी आहे. या अभियानाद्वारे नागरिकांचा सहभाग वाढून स्वच्छ, निरोगी व सुंदर कल्याण-डोंबिवली घडविण्यात निश्चितच यश मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांचे अनुदान थेट बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू

**- उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासासाठी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या सहाय्यक परीक्षण अनुदानाचा पहिला हप्ता थेट ग्रंथालयांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

मंत्री श्री.पाटील म्हणाले, सार्वजनिक ग्रंथालये केवळ पुस्तके ठेवण्याची ठिकाणे नसून समाजातील वाचन संस्कृती जोपासणारी प्रेरणास्थळे आहेत. या ग्रंथालयांना वेळेवर अनुदान उपलब्ध करून देणे महत्वाचे असते. दरवर्षी सार्वजनिक ग्रंथालयांना दोन हप्त्यांमध्ये अनुदान वितरित केले जाते. यापूर्वी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामार्फत पारंपरिक पद्धतीने अनुदान वितरण केले जात असल्याने वेळेत निधी मिळण्यात विलंब होत असे. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्र शिक्षण विभाग व ग्रंथालय संचालनालयाने संगणकाधारित "ग्रंथालय अनुदान व्यवस्थापन प्रणाली" (Library Grant Management System) विकसित केली आहे. या प्रणालीद्वारे अनुदानाचे वितरण प्रक्रिया पारदर्शक झाली आहे. यावर्षी पहिल्या हप्त्यासाठी शासनाने दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार निधी मंजूर केला होता. त्याअंतर्गत एकूण ८० कोटी ५३ लाख ६७ हजार रुपये इतकी देयके मंजूर करून राज्यातील १० हजार ५४६ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना थेट त्यांच्या बँक खात्यात अनुदान जमा करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे सर्व ग्रंथालयांना एकाचवेळी आणि वेळेत निधी उपलब्ध होत आहे. त्यामुळे ग्रंथालयांच्या विकासकामांना गती मिळेल असे मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

# आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**दोन विध्यार्थी दत्तक घेणार : ॲड सुनील गायकर यांचा संकल्प**



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मोहने** : मुंबई उच्च न्यायालयाचे वकील सुनील गायकर तसेच मानिवली ग्रामपंचायत माजी सरपंच सुनिता सुनिल गायकर यांच्या वतीने आमदार किसन कथोरे यांच्या वाढदिवसानिमित्त मौजे ओझरली ,मानिवली ,सांगोडे ह्या गावातील जिल्हा परिषद शाळेत शिकणारे अनुसूचित जमाती (आदिवासी) विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना शैक्षणीक साहित्य चे वाटप करण्यात आले.

यावेळी आदिवासी विकास संस्था ठाणे जिल्हा अध्यक्ष सुनिल डवले सांगोडे शाळा शिक्षण व्यवस्थापन समितीचे कान्हा पाटील तसेच ओझरली ,मानिवली ,सांगोडे गावातील सर्व शिक्षक मुख्याध्यापक ,व मोठ्या संख्यने गावकरी उपस्थित होते.अश्या प्रसंगी ओझरली गावातील केवळ आर्थिक परीस्थिती हालाखीची असल्यामुळे पुढील शिक्षण घेवू न शकणाऱ्या होतकरू ,दोन आदिवासी मुलांना शिक्षण साठी दत्तक घेण्याचा संकल्प अँड सुनिल दत्ता गायकर यांनी बोलून दाखवला त्या प्रसंगी ओझरली जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक कणसे मिस यांनी त्याचे आभार व्यक्त केले.

# टिटवाळ्याच्या अजिंक्य-अस्मिताची क्रीडाक्षेत्रात दणदणीत कामगिरी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा** : नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये टिटवाळा येथील रिजेन्सी सर्वमचे रहिवासी आणि मेरिडियन शाळेचे विद्यार्थी अजिंक्य विनोद इंगळे (इ. १० वी) व अस्मिता विनोद इंगळे (इ. ८ वी) या भाऊ-बहिणीने घवघवीत यश संपादन करत शहराचा झेंडा उंचावला आहे.

दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी कल्याण येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय KDMC DSO बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये अजिंक्य इंगळेने वयोगट १४ मध्ये दमदार कामगिरी करीत ब्रॉंझ पदकाची कमाई केली. यानंतर केवळ काही दिवसांनी, म्हणजे १४ सप्टेंबर २०२५ रोजी अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, मुंबई येथे झालेल्या आशिया कप आंतरराष्ट्रीय ओपन कराटे चॅम्पियनशिपमध्ये अजिंक्य व अस्मिता या भावंडांनी अतुलनीय खेळी दाखवली.


या स्पर्धेत विविध राज्यांसह अनेक परदेशातील जवळपास ५०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. कडवी स्पर्धा असतानाही टिटवाळ्याच्या अजिंक्यने कराटे कातामध्ये ब्रॉंझ पदक आणि फाईट प्रकारातही आणखी एक ब्रॉंझ पदक पटकावत दुहेरी यशाची नोंद केली.

अजिंक्यच्या पावलावर पाऊल ठेवत त्याची धाकटी बहीण अस्मिता इंगळेनेही कौशल्याचे अप्रतिम दर्शन घडवले. अस्मिताने कराटे काता प्रकारात सुवर्ण पदक आणि फाईट प्रकारात ब्रॉंझ पदक मिळवून इंगळे कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण टिटवाळ्याचे नाव उज्ज्वल केले.

या दोन्ही भावंडांच्या लखलखत्या यशामुळे परिसरात सध्या कौतुकाचा वर्षाव होत असून, मेरिडियन शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकवर्गाने त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगती करत असलेले अजिंक्य व अस्मिता यांच्याकडून भविष्यात आणखी मोठ्या स्तरावर यश मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

टिटवाळ्यातून आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजलेल्या या विजयानंतर इंगळे भावंडे आज घराघरात चर्चेचा विषय ठरली आहेत.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in






**मेष**
तुमच्या कौटुंबिक नात्यात काही मतभेद चालू असतील तर तुम्ही दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून ते सोडवले तर तुमच्यासाठी चांगले होईल.

**वृषभ**
आजूबाजूला होणाऱ्या कोणत्याही वादात तुम्ही अडकू नका.कामाने जॉबच्या ठिकाणी तुमच्या वरिष्ठांना खूश कराल ज्यामुळे नवीन पद मिळू शकते.

**मिथुन**
तुम्ही भागीदारीत कोणताही व्यवसाय करण्याचा विचार करत असाल तर तो अजिबात करू नका तो भागीदार तुमची फसवणूक करू शकतो.

**कर्क**
उधार दिले पैसे आज परत मिळू शकतात.वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवून भविष्यासाठी काही पैसे वाचवण्याची योजना आखू शकता.

**सिंह**
दिवस लाभ घेऊन येणार आहे. मनात चाललेल्या गोष्टी कोणाशीही शेअर करणे टाळावे लागेल अन्यथा ती व्यक्ती त्यांचा गैरफायदा घेऊ शकते.

**कन्या**
आरोग्यात काही बिघाड असेल तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका अन्यथा ते तुमच्यासाठी त्रासदायक ठरू शकते. रखडलेले काम पूर्ण होऊ शकते.

**तूळ**
नोकरीत तुमच्या बढतीमुळे कौटुंबिक वातावरण आनंददायी असेल आणि एक छोटी पार्टी देखील आयोजित केली जाऊ शकते.

**वृश्चिक**
तुम्हाला तुमच्या आरोग्याबद्दल जागरूक राहावे लागेल.कामाच्या ठिकाणी तुमच्या निर्णय क्षमतेचा तुम्ही पूर्ण फायदा घ्याल.

**धनु**
कुटुंबातील सदस्याकडून तुम्हाला चांगली बातमी ऐकायला मिळेल.कोणतेही नवीन काम सुरू करण्यापूर्वी तुमच्या पालकांचा आशीर्वाद घ्या.

**मकर**
बँकिंग क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या कारकिर्दीत पदोन्नती दिसेल. व्यवसाय करणाऱ्या लोकांसाठी दिवस थोडा कमकुवत राहणार आहे.

**कुंभ**
तुमच्या दैनंदिन गरजांसाठी खरेदी करण्यासाठी तुम्ही आज पैसे खर्च कराल. तुम्ही भविष्यातील योजनांमध्येही गुंतवणूक करू शकता.

**मीन**
नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना एखादी चांगली बातमी ऐकायला मिळू शकते.कोणतीही अडचण कुटुंबातील सदस्याच्या मदतीने सोडवू शकाल.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# पडघा येथे आर्थिक समावेशन सॅच्युरेशन शिबीर

## आर्थिक समावेशकतेसाठी बँक ऑफ महाराष्ट्राचा पुढाकार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : एफआय सॅच्युरेशन उपक्रमांतर्गत भिवंडी तालुक्यातील राजाराम केशव मंगल कार्यालय, पडघा येथे दि.21 सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 4 वाजता ग्रामपंचायत स्तरावरील आर्थिक समावेशन सॅच्युरेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरास भारत सरकारच्या वित्त मंत्रालयातील वित्तीय सेवा विभागाचे सहसचिव (DFS), ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, भारतीय रिझर्व्ह बँक, राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC), सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि इतर भागधारकांची उपस्थिती लाभणार आहे.

### २१ सप्टेंबर रोजी शिबिराचे आयोजन

बँक खाती, विमा, पेन्शन, क्रेडिट आणि डिजिटल पेमेंट यासारख्या विविध वित्तीय सेवांबद्दल जागरूकता आणि वितरणाद्वारे ग्रामपंचायत स्तरावर 100% आर्थिक समावेशन सुनिश्चित करणे, नागरिकांना थेट शासकीय योजनांचा लाभ देणे, हे या शिबिराचे उद्दिष्ट आहे. तरी या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी, ग्रामस्थांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक अभिषेक पवार व बँक ऑफ महाराष्ट्रचे क्षेत्रीय व्यवस्थापक राजकिशोर रंजित यांनी केले आहे.

# श्रद्धा पतसंस्थेची २६ वी सभा यशस्वी सभेत

## ११ टक्के लाभांश व दिवाळी भेटवस्तूंची घोषणा





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ओतूर** : श्रद्धा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार (दि. २० सप्टेंबर) रोजी ओतूर येथे उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. मनीष अरुण वोरा होते.

**सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. मनीष अरुण वोरा होते.**

या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अरुण वोरा, उपाध्यक्ष शिवशंकर पा. घोलप, सचिव बाळासाहेब ढमाले, संचालक मंडळ सदस्य मधुसूदन घुले, शरद फापाळे, समाधान जगताप, वाल्हु जाधव, बाळासाहेब गायकर, बबन ढमाले, सुजाता महाकाळ, सत्यभामा घोलप, सल्लागार प्रतापराव हांडे देशमुख, रंगनाथ पा. घोलप, अनंतराव फापाळे, महेंद्र शहा, कल्पना कर्डिले तसेच पुणे जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे संचालक विनायक तांबे, तालुका फेडरेशनचे संचालक संतोष तांबे, विघ्नहर साखर कारखान्याचे संचालक धनंजय डुंबरे, बाळासाहेब घुले, सरपंच छायाताई तांबे, ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष दत्तात्रय डुंबरे, ग्रामविकास मंडळाचे संचालक सिताराम डुंबरे यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद, सल्लागार व्यवस्थापक प्रमोद अहिनवे व कर्मचारी कैलास रंधे, रमेश डुंबरे, निलम रंधे उपस्थित होते.

अध्यक्ष डॉ. मनीष वोरा यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की,"श्रद्धा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था स्थापनेपासून सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी सातत्याने कार्यरत आहे. संस्थेची स्थापना १८ ऑक्टोबर १९९९ रोजी झाली. संस्थेची वाटचाल आता अडीच कोटींच्या दिशेने सुरू असून आज सभासद संख्या ६८६ इतकी आहे. संस्थेचे अधिकृत भागभांडवल ५० लाख रुपये आहे. चालू वर्षात ठेवी १ कोटी ६२ लाख ५३ हजार ७३३ रुपये तर कर्जवाटप १ कोटी ५७ लाख ३९ हजार ७४९ रुपये इतके झाले आहे. यंदा संस्थेला ५ लाख ५५ हजार ३६ रुपये इतका निव्वळ नफा झाला असून लेखापरीक्षणात 'अ' वर्ग मिळाल्याचा अभिमान आहे."

यावेळी सभासदांना ११ टक्के लाभांश तसेच दिवाळी भेटवस्तू देण्याची घोषणा करण्यात आली.

सभेच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत सचिव बाळासाहेब ढमाले यांनी केले. अध्यक्षपदाला मान्यता उपाध्यक्ष शिवशंकर घोलप यांनी दिली. सभेचे सूत्रसंचालन ज्येष्ठ सल्लागार प्रतापराव खंडेराव हांडे देशमुख यांनी केले.

ज्येष्ठ मार्गदर्शक उल्हास तांबे यांनी आपल्या मार्गदर्शनातून संस्था अधिक बळकट करण्यासाठी विविध उपाययोजना सुचविल्या. ग्रामीण भागात पतपुरवठ्याबरोबर बचतीचे महत्त्व पटवून द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या विचारांनी सभासदांना नवीन दिशा मिळाली.

शेवटी संस्थेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. आभार प्रदर्शन संचालक बाळासाहेब गायकर यांनी केले.

याप्रसंगी श्रद्धा पतसंस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात यशस्वीरीत्या पार पडली.

# गणेशपुरी येथे गुरुदेव सिद्धपीठ व पोलीस ठाणे यांच्या वतीने वृक्षारोपण

## एक हजार झाडांची यशस्वी लागवड



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी येथे गुरुदेव सिद्धपीठ आश्रम व गणेशपुरी पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने भिवाळी शिवारात भव्य वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमात गणेशपुरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कमलेश बच्छाव यांच्या हस्ते प्रतीकात्मक वृक्षारोपण करण्यात आले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकाच वेळी तब्बल एक हजार झाडांची लागवड करण्यात आली.या वेळी पोलीस विभागातील अधिकारी-कर्मचारी, गुरुदेव सिद्धपीठाचे पदाधिकारी, पत्रकार, ग्रामस्थ तसेच अनेक पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

झाडांची निगा व संगोपनाची जबाबदारी गुरुदेव सिद्धपीठाने स्वीकारली असून "फक्त झाडे लावणे नव्हे तर ती जगविणे हेच खरे पर्यावरण संवर्धन आहे" असा संकल्प या वेळी व्यक्त करण्यात आला. या उपक्रमामुळे तानसा खोऱ्यातील गणेशपुरी परिसर अधिक हिरवागार व पर्यावरणपूरक होण्यास हातभार लागणार आहे.

# भिवंडीचा कार्तिक यांचा ऐतिहासिक पराक्रम

## परदेशात झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेत ग्रँडमास्टरवर मिळवला विजय

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहरातील कोंबडपाडा परिसरात राहणारा कार्तिक हनुमंत कुंभार ( वय-26) यांने शालेय जीवनापासून बुद्धिबळाला आपल्या जीवनाचे लक्ष बनवीत भिवंडी पासून राज्यस्पर्धा व राष्ट्रीय स्पर्धेत आपला ठसा उमटवीत विविध स्पर्धा जिंकत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत देखील विक्रम केले,युरोपातील स्पेनमध्ये झालेल्या स्पर्धेत २७५ फिडे गुणांची झेप घेत ग्रँडमास्टरवर विजय मिळवित आपले स्वप्न पूर्ण केले आहे.त्यामुळे मान्यवर नागरिकांनी त्याचे अभिनंदन केले आहे.





युरोपातील स्पेन देशातील बार्सिलोना शहरात जुलै-ऑगस्ट २०२५ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेतील ६ स्पर्धांत त्यांनी सहभाग घेतला. अमेरिका, चीन, जपान, जर्मनी, फ्रान्स, स्पेन अशा २०-३० बलाढ्य देशांतील स्पर्धेमध्ये खेळाडूंना पराभूत करत कार्तिक यांनी तब्बल २७५ फिडे रेटिंग गुणांची वाढ केली. दोन महिन्यापूर्वी १७४५ वरून थेट २०२० रेटिंगपर्यंत पोहोचत त्यांनी "२००० मार्क ओलांडण्याचे आपले स्वप्न साकार केले.

कार्तिक यांने प्रथम २०१८ मध्ये आपले पहिले रेटिंग मिळविले होते. त्यानंतर तब्बल ७ वर्षे शेकडो स्पर्धा खेळत, भारतभर प्रवास करीत आणि युरोपमधील पहिल्याच दौऱ्यात त्यांनी फिडे रेटिंगची प्रत्यक्षात वाढ केली. बुद्धिबळात ग्रँडमास्टर ही सर्वात उच्च पदवी असते.स्पेनमधील एका ग्रँडमास्टरवर मिळवला आहे.त्यामुळे १७४५ रेटिंगवरून थेट ग्रँडमास्टरवर मात करणे हे अत्यंत ऐतिहासिक यश ठरले आहेत.

अशी माहिती कार्तिक कुंभार यांने दिली. "पहिल्यांदाच मी भारताबाहेर खेळत होतो. माझ्या नावासमोर भारतीय ध्वज झळकत होता. तो ध्वज पाहून मला देशासाठी खेळण्याची प्रेरणा मिळाली आणि विजयाची ताकद मिळाली."या आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी त्यांला AICF (ऑल इंडिया चेस फेडरेशन) व MCA (महाराष्ट्र चेस असोसिएशन) यांचे औपचारिक निमंत्रण व सहकार्य लाभले.

कार्तिक कुंभार बी.ई. (मेकॅनिकल) पदवीधर व व्यावसायिक फिडे रेटेड बुद्धिबळपटू असुन त्याचे वडील हनुमंत कुंभार हे सध्या भिवंडी मनपा शाळा क्र. १९ चे मुख्याध्यापक आहेत. ऐतिहासिक यश संपादन केल्याने शहरातील विविध स्तरातून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# वॉकेथॉन व चर्चासत्रातून श्वानदंश जनजागृती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : रोटरी क्लब ऑफ डोंबिवली मिडटाऊन आणि व्हेटरनरी प्रॅक्टिशनर्स वेलफेअर असोसिएशन यांच्या वतीने जागतिक श्वानदंश जनजागृती वाकेथॉन व चर्चासत्र असा एक कार्यक्रम ठेवण्यात आला होता. जागतिक अँटी-रेबीज दिन हा 28 सप्टेंबर रोजी जगभर साजरा करण्यात येतो. त्या निमित्ताने डोंबिवली परिसरात संस्थेतर्फे दिनांक 7 ते 13 सप्टेंबर या कालावधीत भटक्या कुत्र्या मांजरासाठी मोफत अँटी -रेबीज लसीकरण मोहीम राबविण्यात आली होती. त्यावेळी 1752 भटके कुत्रे व 77 भटके मांजरांना असे एकूण 1829 कुत्रे मांजरांना लसीकरण करण्यात आले होते.





आज शनिवारी या निमित्ताने श्वानदंश जनजागृती वाकेथॉन व चर्चासत्र असा एक कार्यक्रम ठेवण्यात आला होता. ह एमआयडीसी निवासी, मिलापनगर मधील वंदेमातरम उद्यान पासून वॉकेथॉनला सुरवात करण्यात आली. एमआयडीसी मधील प्रमुख रस्त्यावरून फिरून तिचा समारोप शिवप्रतिमा मित्र मंडळ सभागृह येथे झाला. या वॉकेथॉन मध्ये अनेक शाळा कॉलेज विद्यार्थी, रोटरीयन, एव्हरग्रीन सायकल प्रेमी ग्रुपच्या महिला वर्ग, मिलापनगर व निवासी परिसरातील नागरिक, प्राणीमित्र इत्यादी उपस्थित होते. शिवप्रतिमा मित्र मंडळ सभागृहात याच विषयावर चर्चासत्र झाले. या उपक्रमात सहभागी आणि सहाय्य करणाऱ्या संस्था, प्राणीप्रेमी, नागरिक यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ निलेश जयवंत, विद्याधर भुस्कुटे, रोटरी क्लब ऑफ डोंबिवली मिडटाऊनचे अध्यक्ष अनिल हिरावत, सेक्रेटरी अभिषेक सोनार, प्रकल्प प्रमुख डॉ मनोहर अकोले हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मकरंद गणपुले यांनी केले.

# राज ठाकरे यांनी घेतला कल्याण डोंबिवलीचा धावता आढवा

## निवडणुकीसाठी तयारीला लागण्याचे दिले आदेश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आगामी महापालिका निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली असून महाराष्ट्र नवनिर्माण सेना देखील कामाला लागली आहे. याचाच भाग म्हणून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज कल्याणमध्ये धावती भेट देऊन कल्याण डोंबिवलीतील कार्यकर्त्यांकडून पक्षाचा आढावा घेतला. कल्याण पश्चिमेतील हॉटेल गुरुदेव ग्रँड येथे राज ठाकरे यांच्या उपस्थितीत कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत राज ठाकरे यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना निवडणुकीसाठी कोण कोण इच्छुक आहेत याबाबत विचारणा केली. निवडणुकीत युती होईल न होईल पण निवडणुकीसाठी तयारीला लागण्याचे आदेश दिले. यानंतर अवघ्या काही मिनिटांत हि बैठक आटोपती घेत घेत राज ठाकरे मुंबईच्या दिशेने रवाना झाले.



यावेळी मनसे नेते माजी आमदार राजू पाटील, प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार प्रकाश भोईर, ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव, कल्याण जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर, मनसे महिला सेना राज्य सचिव उर्मिला तांबे, महिला शहर अध्यक्षा कस्तुरी देसाई, विद्यार्थी सेना शहर अध्यक्ष विनोद केणे, माजी शहर अध्यक्ष कौस्तुभ देसाई, उपशहर अध्यक्ष गणेश चौधरी आदींसह इतर अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# ठाणे जिल्हा मजुर कामगार सहकारी संघाची वार्षिक सभा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : ठाणे व पालघर जिल्ह्यातील ६७३ मजुर संस्था सभासद असलेल्या ठाणे जिल्हा मजुर कामगार सहकारी संस्थाचा संघ मर्यादित या संस्थेची वार्षिक सभा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाली.





संघाची ५६ वी वार्षिक सभा स्व. वसंतराव नाईक सभागृहात अध्यक्ष वंसत फुलवर यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयासंदर्भात शुक्रवारी घेण्यात आली यावेळी सभेच्या पटलावर असलेले विषय व्यवस्थापक संजय कदम यांनी वाचुन दाखवले. त्यावर साधक बाधक चर्चा करून सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील उपस्थीत होते. ठाणे जिल्हा मजुर सहकारी संस्थांच्या संघाला पूर्वीसारखा सुवर्णकाळ येण्यासाठी शासन स्तरावर आणखी प्रयत्न करण्याची गरज असुन संघाला मजबूत करण्यासाठी सर्वांनीं संघटीत होणे गरजेचे आहे. तसेच संघांनी मजुर संस्थांना वेगवेगळ्या सुवीधा कशा मिळतील याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे कपिल पाटील यांनी तर गृहनिर्माण संस्थाचां पुनर्विकास करताना ती कामे मजुर संस्थांना मिळावी यासाठी व वेगवेगळया मार्गाने संघामार्फत मजुर संस्थांना कामे मिळावी यासाठी संघ प्रयत्नशील असुन त्यासाठी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सहकार्य करण्याची गरज असल्याचे अरुण पानसरे यांनी यावेळी भाषणात सांगितले तर यावेळी माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक प्रशांत पाटील, पंडीत पाटील,अमोल तारमळे, अनिल मुंबईकर, मोहन अंधेरे, सुरेंद्र (विकास) पाटील, बाळु पाटील सह शेकडो मजुर सहकारी संस्थांचे पदाधिकारी, प्रतीनीधी उपस्थित होते. सभेचे प्रस्ताविक अध्यक्ष वंसत फुलवर उपाध्यक्ष - जयसिंग सांवत यांनी तर सुत्रसंचालन अमर राऊत यांनी केले.

# संत रोहिदास महाराज समाज मंदिराचे भूमिपूजन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : राष्ट्रीय चर्मकार महासंघ यांच्यातर्फे आनंदवाडी, रोहिदास वाडा, कल्याण पूर्व येथे संत रोहिदास महाराज यांच्या समाज मंदिराचे भूमिपूजन सोहळा आयोजित करण्यात आला होता. आमदार सुलभा गायकवाड यांच्या हस्ते संत रोहिदास महाराज समाज मंदिराचे भूमिपूजन करण्यात आले. माजी आमदार गणपत गायकवाड यांच्या सहकार्याने, प्रयत्नाने त्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झाल्याचे समाधान असल्याचे सुलभा गायकवाड यांनी सांगितले. समाज मंदिर हे केवळ एक इमारत नाही, तर आपल्या समाजाचे एकत्र येण्याचे ठिकाण आहे. इथून आपल्या सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकासाला नक्कीच दिशा मिळेल, असा विश्वास गायकवाड यांनी व्यक्त केला.

या मंदिरासाठी राम बनसोडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून समाजाच्या प्रगतीसाठी, उन्नतीसाठी आणि एकतेसाठी हे मंदिर केंद्रबिंदू ठरेल. समाज नेहमीच कष्टाळू, प्रामाणिक आणि संघर्षशील राहिला आहे. आता या समाज मंदिरामुळे नव्या उंचीवर पोहोचू असे राम बनसोडे यांनी सांगितले. यावेळी मंडळ अध्यक्ष विजय उपाध्याय, भैरवनाथ वाघमारे, प्रकाश लांडगे, नागनाथ कांबळे, गजेंद्र राऊत, सोमनाथ राऊत, हनुमंत गायकवाड, प्रमोद जळगांवकर, भिकाजी कांबळे, लक्ष्मण आंबोकार, मंगलताई गायकवाड, कविता रुपवते, ममता निमोरे, ललिता साबळे, मुमताज शेख तसेच इतर पदाधिकारी कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# भिवंडीतील प.रा.विद्यालय विद्यार्थ्यांसाठी रानभाज्या महोत्सव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : पालेभाज्या या आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी सत्वशील असतात त्यामुळे जेवन करताना आहारात त्याचा जास्तीत जास्त समावेश असावा असे डॉक्टर नेहमी सांगत असतात त्यामुळे डोंगरदऱ्यात विशेषतः पावसाळ्यात उगवणाऱ्या रानभाज्यांची माहिती चिमुकल्या विद्यार्थ्यांना मिळावी या उद्देशान भिवंडी शहरातील ब्राह्मण आळी येथील जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या पूर्व प्राथमिक शाळेत शुक्रवारी रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी प्रदर्शनात ठेवलेल्या रानभाज्यांची माहिती आपल्या सहकारी विद्यार्थ्यांना चिमुकल्यांनीच देऊन सर्वांची मने जिंकली.या मध्ये चिमुकल्यांनी डोंगर दऱ्यात मिळणाऱ्या रानभाज्याची माहिती,उपयोग,आरोग्य विषयक फायदे ही माहिती उपस्थितांना दिली.



या उपक्रमाचे शिक्षक व विद्यार्थ्यांचे जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या पूर्व प्राथमिक विभागाचे अध्यक्ष शाम सिंगासणे यांनी कौतुक केले.विद्यालयाच्यावतीने विद्यार्थ्यांना रानभाज्या सारख्या पौष्टिक आहाराची माहिती व्हावी या उद्देशाने हा महोत्सव आयोजित केला ही आनंदाची बाब आहे असे मत अध्यक्ष सिंगासणे यांनी व्यक्त केले.यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता सुतार,चित्रकला शिक्षक संतोष भोईर व महिला शिक्षिका उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी रानभाज्या संदर्भात दिलेल्या उपयुक्त माहिती दिल्या बद्दल विद्यार्थ्यांचे उपस्थितीताना कौतुक केले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकवर्गाने विशेष मेहनत घेतली.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष

## गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी आशेचा किरण

आपल्या समाजात अनेक कुटुंबे अशी आहेत, ज्यांना अचानक उद्भवलेल्या गंभीर आजारामुळे किंवा अपघातामुळे मोठे वैद्यकीय खर्च करावे लागतात. अशा वेळी आर्थिक अडचणींमुळे अनेकांना योग्य उपचार मिळविणे कठीण होते. याच गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष (Chief Minister Medical Assistance Cell) सुरू केला आहे. हा कक्ष खऱ्या अर्थाने अनेकांसाठी 'जीवनदायी' ठरत आहे, आणि यामागे एक सुव्यवस्थित यंत्रणा कार्यरत आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे उद्दिष्ट आणि कार्यक्षेत्र: मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा मुख्य उद्देश हा राज्यातील गरजू नागरिकांना दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे. या निधीतून केवळ वैद्यकीय मदतच नाही, तर नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या नागरिकांनाही आर्थिक सहाय्य पुरविले जाते. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी प्रयत्न केले जातात. मुख्यमंत्री सचिवालयाच्या दि.13 ऑगस्ट 2015 च्या परिपत्रक क्र. मुमंसनि-2015/प्र.क्र.1/निधी कक्ष नुसार गेल्या काही वर्षांपासून मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष कार्यरत असून, या कक्षाच्या माध्यमातून हजारो रुग्णांना उपचार मिळाले आहेत.

**मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची (Chief Minister's Relief Fund and Charitable Hospital Assistance Cell) उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:**

1. आर्थिक दुर्बल रुग्णांना वैद्यकीय मदत पुरविणे: राज्यातील गरीब व गरजू नागरिकांना महागड्या व जीवनावश्यक उपचारांसाठी आर्थिक सहाय्य देणे (जसे को कर्करोग, हृदयरोग, किडनी प्रत्यारोपण, इत्यादी).
2. धर्मादाय रुग्णालयांमधील सुविधा वाढविणे: राज्यातील धर्मादाय (Charitable) रुग्णालयांना आवश्यक वैद्यकीय उपकरणे, औषधे किंवा सुविधा निर्माण करण्यासाठी सहाय्य करणे.
3. सरकारी आणि खासगी यंत्रणांमधील समन्वय: वैद्यकीय मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालयांमधील सेवा एकत्रित करून नागरिकांना सुलभ सेवा देण्याचा उद्देश.
4. आरोग्य सेवा उपलब्धतेत समता आणणे: गरीब, वंचित, आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांनाही उच्च दर्जाची आरोग्य सेवा मिळावी, यासाठी प्रयत्न करणे.
5. सामाजिक जबाबदारी अंतर्गत रुग्णालयांकडून मदत मिळविणे: धर्मादाय रुग्णालयांनी त्यांच्या CSR (Corporate Social Responsibility) अथवा Trust च्या माध्यमातून अधिकाधिक गरीब रुग्णांवर मोफत किंवा सवलतीने उपचार करावेत, यासाठी त्यांच्याशी समन्वय ठेवणे.
6. त्वरित निर्णयप्रक्रिया व पारदर्शकता: रुग्णांच्या अर्जावर त्वरीत निर्णय घेणे व निधी वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखणे.

**राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय समित्या:**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीच्या योग्य आणि पारदर्शक वितरणासाठी राज्य आणि जिल्हास्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्या निधीचा वापर योग्य गरजूंपर्यंत पोहोचतो की नाही याची खात्री करण्यासाठी नेमण्यात आल्या आहेत.

राज्यस्तरीय समिती (मंत्रालय स्तर)

राज्यस्तरीय समिती ही मुख्यमंत्री सहायता निधीच्या व्यवस्थापनाची आणि धोरणात्मक निर्णयांची शिखर संस्था आहे. मुख्यमंत्री कार्यालयाच्या अखत्यारित हा कक्ष कार्य करतो.

**प्रमुख कार्ये:**

* निधीच्या वितरणाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.
* मोठ्या आर्थिक मदतीसाठीच्या अर्जांचे पुनरावलोकन करणे.
* राज्यभरातील निधीच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवणे.
* नवीन आजार किंवा उपचारांचा निधीसाठी समावेश करण्याबाबत विचार करणे.
* राज्यातील सर्व जिल्हास्तरीय कक्षांशी समन्वय साधणे.

**जिल्हास्तरीय समिती (जिल्हाधिकारी कार्यालय):**

राज्यातील आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष' सुरू करण्यात यावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते, त्यानुसार या कक्षाचे दि.1 मे 2025 रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पालकमंत्री / मंत्री/ राज्यमंत्री यांच्या हस्ते संपूर्ण राज्यात उद्घाटन करण्यात आले. या कक्षाचे राज्यस्तरीय प्रमुख म्हणून रामेश्वर नाईक हे जबाबदारी सांभाळीत आहेत.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची जबाबदारी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.प्रियांका यादव व त्यांचे सहकारी कुशलतेने सांभाळीत आहेत.

राज्यातील गरजू रूग्णांना उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत पुरविली जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यासंदर्भात दि.22 फेब्रुवारी 2025 रोजी शासन निर्णय काढण्यात आला. शिवाय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाची दि.23 एप्रिल 2025 रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली होती, या बैठकीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करणेबाबत निर्देश दिले होते.

वैद्यकीय उपचासाठी मदत मिळावी, याकरिता गरजू रूग्ण व त्यांचे नातेवाईक मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे मोठ्या प्रमाणात अर्ज करत असतात. अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी ते मंत्रालयात वारंवार येतात. रूग्ण व नातेवाईकांना होणारा त्रास लक्षात घेवून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून रूग्ण व नातेवाईकांची परवड थांबविण्याच्या उद्देशातून हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमध्ये रुग्णालय अंगीकृत करण्याची प्रक्रिया आणि मुख्यमंत्री वैद्यकीय अर्थसहाय्य वितरीत करणे, या दोन्ही प्रक्रिया संपूर्णतः निःशुल्क आहेत.

नागरिकांची सोय लक्षात घेऊन, अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष सुरू करण्यात आले आहेत. यामुळे अर्जदारांना मंत्रालयात जाण्याची गरज राहिलेली नाही, ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचतो. जिल्हास्तरीय समिती ही स्थानिक पातळीवरच्या गरजा आणि अर्जदारांना तात्काळ मदत देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

**प्रमुख कार्ये:**

* जिल्ह्यातील मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीसाठीचे अर्ज स्वीकारणे.
* अर्जांची प्राथमिक पडताळणी करणे आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता तपासणे.
* लहान किंवा कमी गुंतागुंतीच्या वैद्यकीय प्रकरणांमध्ये त्वरित निर्णय घेऊन निधी मंजूर करणे.
* आवश्यकतेनुसार, अर्ज राज्यस्तरीय समितीकडे शिफारशीसाठी पाठवणे.
* रुग्णालयांशी समन्वय साधणे आणि उपचारांच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे.
* स्थानिक गरजू रुग्णांना निधी योजनेची माहिती देणे आणि अर्ज भरण्यास मदत करणे.

ही प्रक्रिया अधिकाधिक कागदविरहित (Paperless) करण्याचा प्रयत्न केला जात आहे, ज्यामुळे अर्जदारांना अधिक सुलभपणे मदत मिळू शकेल.

**कोणत्या आजारांसाठी किती मदत?**
**(आर्थिक मदतीची मर्यादा)**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून विविध दुर्धर आणि महागड्या आजारांसाठी आर्थिक मदत दिली जाते. या मदतीची रक्कम आजाराची तीव्रता, उपचाराचा खर्च आणि आवश्यकतेनुसार ठरवली जाते. साधारणतः, प्रत्येक आजारासाठी निश्चित केलेली कमाल मर्यादा असते, जी खालीलप्रमाणे असून ही माहिती बदलू शकते, अद्ययावत माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळही तपासावे.

मात्र राज्याबाहेरील रुग्णालयांवर महाराष्ट्र शासनाचे यंत्रणांचे नियंत्रण नसते. तसेच त्यांच्याकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेणे शक्य होत नसल्यामुळे राज्याबाहेरील रुग्णालयांना अर्थसहाय्य प्रदान करण्यास प्रतिबंध करण्यात आलेले आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय समितीच्या शिफारशीनुसार रुपये 25 हजार, 50 हजार, 1 लक्ष आणि महत्तम रुपये 2 लक्ष आजारांनिहाय मर्यादित रक्कम प्रदान करण्यात येते.

* कर्करोग (Cancer): कर्करोगाच्या उपचारासाठी (केमोथेरपी, रेडिएशन, शस्त्रक्रिया) मोठ्या प्रमाणात आर्थिक मदतीची आवश्यकता असते. यासाठी रु. 1,00,000 (एक लाख रुपये) पर्यंतची मदत मिळू शकते. गुंतागुंतीच्या किंवा महागड्या शस्त्रक्रियांसाठी ही मर्यादा वाढू शकते.
* हृदयविकार (Cardiac Diseases): हृदय शस्त्रक्रिया (बायपास, अँजिओप्लास्टी), हृदय प्रत्यारोपण यांसारख्या उपचारांसाठी रु.2,00,000/- (दोन लाख रुपये) पर्यंत मदत मिळू शकते.
* मूत्रपिंड विकार (Kidney Diseases): मूत्रपिंड प्रत्यारोपण (Kidney Transplant) किंवा डायलिसिससाठी रु. 1,00,000/- (एक लाख रुपये) पर्यंत मदत दिली जाते.
* मेंदूविकार (Neurological Disorders): ब्रेन ट्यूमर शस्त्रक्रिया, पक्षाघातावरील उपचार यांसारख्या गंभीर मेंदूविकारांसाठी रु. 1,00,000/- (एक लाख रुपये) पर्यंत आर्थिक मदत मिळू शकते.
* अपघात आणि गंभीर दुखापती (Accidents & Major Injuries) ट्रॉमा: गंभीर अपघातांमुळे होणाऱ्या शस्त्रक्रिया, अवयव निकामी होणे, मुख्यत्वे डोक्याला गंभीर इजा यांसारख्या उपचारांसाठी रु. 50,000/- (पन्नास हजार रुपये) ते रु. 1,00,000/- (एक लाख रुपये) पर्यंत मदत मिळू शकते.
* कॅन्सर (सर्व प्रकार) वरील उपचारांसाठी रु.2,00,000/- (दोन लाख रुपये) पर्यंत मदत मिळू शकते.
* सेरेब्रो व्हॅस्कुलर ॲक्सिडंट (CVA) या बाबीवरील उपचारांसाठी रु.2,00,000/- (दोन लाख रुपये) पर्यंत मदत मिळू शकते.
* प्रत्यारोपण शस्त्रक्रिया (Organ Transplants - इतर अवयव): यकृत प्रत्यारोपण, फुफ्फुस प्रत्यारोपण यांसारख्या अतिशय महागड्या शस्त्रक्रियांसाठी विशेष परिस्थितीत रु.1,50,000/- (दीड लाख रुपये) पर्यंत किंवा त्याहून अधिक मदत मिळू शकते. यासाठी ZTCC (झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर) किंवा शासकीय समितीची मान्यता आवश्यक असते.
* इतर दुर्धर आजार: वरील आजारांव्यतिरिक्त, ज्यांसाठी उपचार खर्चिक आहेत आणि रुग्णाला आर्थिक मदतीची नितांत गरज आहे, अशा इतर दुर्धर आजारांसाठीही रु. 50,000/- (पन्नास हजार रुपये) ते रु. 75,000/- (पंच्याहत्तर हजार रुपये) पर्यंत मदत मिळू शकते.

प्रत्येक प्रकरणाची तपासणी करून आणि वैद्यकीय अहवाल तसेच समितीच्या शिफारशीनुसार अंतिम मदत रक्कम ठरविली जाते.

आरोग्यासाठीच्या शासकीय योजनांचा सुयोग्य वापर होण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये अर्ज करण्यापूर्वी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(1) डिस्चार्ज झालेल्या / उपचार पूर्ण झालेल्या रुग्णांना खर्चाची प्रतिपूर्ती म्हणून अर्थसहाय्य देय नाही.

(2) महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना (मोफत उपचार):- या योजनेच्या आपल्या जिल्ह्याच्या समन्वयकास (ठाणे जिल्हा- डॉ. प्रियांका यादव, वैद्यकीय अधिकारी, संपर्क क्र.9561729824) फोन करून पेशंटला नामतालिकेवरील (Empanelled) दवाखान्यात ॲडमिट करावे. www.jeevandayee.gov.in या वेबसाईटवर हॉस्पिटलची यादी उपलब्ध आहे.

(3) चॅरिटी हॉस्पिटल (मोफत / सवलतीच्या दरात):- जिल्ह्यातील चॅरिटी हॉस्पिटलमधील उपलब्ध बेडबाबत माहिती चॅरिटी इन्स्पेक्टर / त्यांचे कार्यालयातून घेऊन त्यानुसार रुग्णास चॅरिटी बेड उपलब्ध असलेल्या दवाखान्यात ॲडमिट करावे. www.charity.maharashtra.gov.in या वेबसाईटवर हॉस्पिटलची यादी उपलब्ध आहे.

(4) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (RBSK) (मोफत उपचार):- 0 ते 18 वर्षे वयांपर्यंतच्या पेशंटसाठी या योजनेंतर्गत मोफत उपचार केले जातात. www.rbsk.gov.in या वेबसाईटवर हॉस्पिटलची यादी उपलब्ध आहे.

5. मुख्यमंत्री सहाय्यता निधी:- (1) कॉकलियर इम्प्लांट वय वर्षे 2 ते 6), (2) हृदय प्रत्यारोपण, (3) यकृत प्रत्यारोपण, (4) किडणी प्रत्यारोपण, (5) फुफ्फुस प्रत्यारोपण, (6) बोन मॅरो प्रत्यारोपण, (7) हाताचे प्रत्यारोपण, (8) हिप रिप्लेसमेंट, (9) कर्करोग शस्त्रक्रिया, (10) रस्ते अपघात, (11) लहान बालकांची शस्त्रक्रिया, (12) मेंदूचे आजार, (13) हृदयरोग, (14) डायलिसिस, (15) कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), (16) अस्थिबंधन, (17) नवजात शिशुंचे आजार, (18) गुडघ्याचे प्रत्यारोपण, (19) बर्न रुग्ण (MLC), (20) विद्युत अपघात रुग्ण (MLC) या अशा एकूण 20 गंभीर आजारांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षातर्फे आर्थिक सहाय्य केले जाते.

उपरोक्त तीनही योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या आणि राज्यातील या योजनेत नोंदणीकृत रुग्णालयात उपचार घेणाऱ्या पात्र रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून वैद्यकीय समितीमार्फत तपासून अर्थसहाय्य दिले जाते. संपर्क क्रमांक: 022-22026948 / व्हॉट्सॲप क्रमांक: 9049789567.

सद्य:स्थितीत मुख्यमंत्री सहायता निधी कक्षास सुमारे 3 हजार 800 हून जास्त रुग्णालये संलग्नित आहेत. या रुग्णालयांची यादी वेबसाईटवर www.cmrf.maharashtra.gov.in उपलब्ध आहे.

* या योजनेचा लाभ महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम किंवा धर्मादाय रुग्णालये यांसारख्या इतर योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या रुग्णांना दिला जातो, जेणेकरून मर्यादित निधीचा योग्य वापर होईल.
* रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर या निधीसाठी अर्ज करता येत नाही; उपचार सुरू असतानाच अर्ज करणे अपेक्षित आहे.

**पात्रतेचे निकष आणि आवश्यक कागदपत्रे:**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा लाभ घेण्यासाठी काही पात्रता निकष आणि आवश्यक कागदपत्रे आहेत:

* उत्पन्नाचा दाखला: अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. 1.60 लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. (तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.)
* आधार कार्ड: रुग्णाचे महाराष्ट्र राज्याचे आधार कार्ड. लहान मुलांसाठी आईचे आधार कार्ड आवश्यक.
* रेशन कार्ड: रुग्णाचे महाराष्ट्र राज्याचे रेशन कार्ड (केशरी किंवा पिवळया रंगाचे).
* वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रक/प्रमाणपत्र: डॉक्टरांच्या सही-शिक्क्यानिशी मूळ वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रक किंवा प्रमाणपत्र. खाजगी रुग्णालयाच्या बाबतीत, हे प्रमाणपत्र सिव्हील सर्जन यांनी प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.
* संबंधित आजाराचे रिपोर्ट्स: आजाराशी संबंधित सर्व वैद्यकीय अहवाल (रिपोर्ट्स).
* अपघातग्रस्त असल्यास: FIR (First Information Report) किंवा MLC (Medico-Legal Case) रिपोर्ट आवश्यक.
* प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी: ZTCC (झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर) किंवा शासकीय समितीची मान्यता आवश्यक.
* रुग्णालयाची नोंद: उपचार घेत असलेल्या रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. (फक्त नोंदणीकृत रुग्णालयेच मदत निधीसाठी पात्र असतात.)

**अर्ज प्रक्रिया:**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीसाठी अर्ज प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे:

अर्ज व आवश्यक कागदपत्रे aao.cmrf-mh@gov.in या ई-मेल आयडीवर पाठविणे आवश्यक आहे.

* अर्ज डाऊनलोड करावा: मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा विहित नमुन्यातील अर्ज संबंधित संकेतस्थळावरून (उदा. cmrf.maharashtra.gov.in) किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातून प्राप्त करावा.
* कागदपत्रे जमा करावेत: अर्जासोबत वर नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे स्व-साक्षांकित (Self Attested) करून जोडावीत.
* अर्ज सादर करावा: पूर्ण भरलेला अर्ज आणि कागदपत्रे आपल्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सहायता कक्षात सादर करावीत. काही जिल्ह्यांमध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची सोय देखील उपलब्ध आहे.
* अर्जाचा पाठपुरावा: अर्ज सादर केल्यानंतर त्याच्या स्थितीची माहिती घेण्यासाठी संबंधित कार्यालयात संपर्क साधता येतो. अनेक ठिकाणी यासाठी टोल फ्री क्रमांक किंवा ऑनलाईन 'अर्ज स्थिती' तपासण्याची सुविधा उपलब्ध आहे.

1. अर्ज (विहीत नमुन्यात).
2. रुग्ण दाखल असल्यास त्याचा Geo Tag फोटो सोबत जोडणे / पाठवणे बंधनकारक आहे.
3. निदान व उपचारासाठी लागणाऱ्या वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. (खाजगी रुग्णालय असल्यास सिव्होल सर्जन यांचेकडून हॉस्पिटल खर्चाचे अंदाजपत्रक प्रमाणित करणे आवश्यक आहे.)
4. तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला घालू वर्षाचा (रुपये 1.60 लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे.)
5. रुग्णाचे आधार कार्ड (महाराष्ट्र राज्याचे) लहान बाळासाठी (बाल रुग्णांसाठी) आईचे आधारकार्ड आवश्यक आहे.
6. रुग्णांचे रेशनकार्ड (महाराष्ट्र राज्याचे).
7. संबंधित आजाराचे रिपोर्ट असणे आवश्यक आहे.
8. अपघातग्रस्त रुग्णांसाठी FIR रिपोर्ट आवश्यक आहे.
9. प्रत्यारोपण रुग्णांसाठी ZTCC / शासकीय समितीची मान्यता आवश्यक आहे.
10. रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री राहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असल्याची खात्री करावी.

अर्थसहाय्याची मागणी ई-मेल द्वारे केल्यास अर्जासह सर्व कागदपत्रे PDF स्वरूपात (वाचनीय) पाठवून त्याच्या मूळ प्रती मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे टपालाद्वारे तत्काळ पाठविण्यात यावेत.

मे 2025 ते ऑगस्ट 2025 दरम्यान ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून 837 लाभार्थ्यांना 7 कोटी 48 लाख 70 हजार मदत झाली.

**FCRA सर्टिफिकेटमुळे परकीय देशातील देणगीचा मार्ग मोकळा:**- जानेवारी महिन्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीला FCRA प्रमाणपत्र मिळाले, महाराष्ट्र-एफसीआरए प्रमाणपत्र मिळवणारे देशातील पहिले राज्य ठरले. त्यामुळे आता मुख्यमंत्री सहाय्यता निधीला परदेशातील व्यक्ती, संस्था, कंपन्यांकडून थेट आर्थिक मदत स्वीकारता येणार आहे.

**महत्वपूर्ण तांत्रिक सुधारणा ऑनलाईन पडताळणी प्रणाली:**- जून महिन्यात उत्पन्न प्रमाणपत्रांची पडताळणी महसूल विभागाच्या ऑनलाईन प्रणालीशी थेट जोडण्यात आली. त्यामुळे बनावट दस्तऐवजांना आळा बसला असून पात्र रुग्णांना जलद मदत मिळू शकते.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष हे महाराष्ट्रातील गरजू रुग्णांसाठी एक महत्त्वाचे आणि संवेदनशील पाऊल आहे. राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय समित्यांच्या माध्यमातून, तसेच स्पष्ट पात्रता निकषांमुळे, ही योजना आर्थिक अडचणींमुळे कोणाचाही उपचार थांबू नये, यासाठी कार्यरत आहे. या कक्षाच्या माध्यमातून मिळणारी मदत खरोखरच अनेक गरजू कुटुंबांसाठी आशेचा किरण ठरत आहे.

**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,ठाणे**

# सासणे परिसरातील अंगणवाडीमध्ये साहित्य वाटप



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : न्हावे ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच जगदीश हिंदुराव व शिरवली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तानाजी घागस तसेच सावळाराम बाळकृष्ण हिंदुराव यांच्या संकल्पनेतून सासणे ,शिरवली परिसरातील अंगणवाडींना खेळणी, शैक्षणिक साहित्य व मुलांना बसण्यासाठी चटईचे वाटप करण्यात आले. अंगणवाडीमध्ये प्रथमच साहित्य वाटप केल्याबद्दल लहान विद्यार्थ्यांमध्ये अतिशय आनंदाचे वातावरण होते विद्यार्थ्यांना खाऊ व शैक्षणिक साहित्य वाटप करून आदरणीय आमदार कथोरे साहेबांच्या वाढदिवसा निमित्त अनोखा उपक्रम राबविल्या बद्दल परिसरातील ग्रामस्थांनी कौतुक करत आभार व्यक्त केले लहान विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी आमदार महोदयांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा दिल्या. अतिशय आनंदी वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

भविष्यामध्ये अंगणवाडींना काही गरज लागल्यास आम्हाला जरूर सांगा आदरणीय आमदार साहेबांपर्यंत आम्ही निरोप पोहोचवण्याचं काम नक्की करू परिसरातील अंगणवाडी शिक्षिका भाग्यश्री हिंदुराव, आशा पठारे, उषा घरत , वैशाली दवणे, मीरा कुर्ले यांनी मनापासून आभार व्यक्त केले.

# झाड कोसळल्याने फळेगाव फीडर ठप्प

## पद्मावतीसह अनेक भाग अंधारात



**दुरुस्तीचे काम युद्ध पातळीवर**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**टिटवाळा** : टिटवाळा गोवेली रस्त्यावर असणाऱ्या पद्मावती परिसरातील २२ केव्हीच्या फळेगांव फीडरवर भले मोठे झाड कोसळल्याची घटना घडल्याने परिसरातील वीजपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे. या अडचणीमुळे गोवेली रोड, पद्मावती, रुंदे रोड, बालाजी नगर, स्वप्ननगरी, जावई पाडा आणि शंकर महाराज मठ फळेगांव, रुंदे आंबिवली या परिसरातील नागरिकांना अचानक अंधारात बसावे लागले आहे.

घटनेची माहिती मिळताच महावितरणचे कर्मचारी आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले असून, झाड हटवणे व तुटलेल्या विद्युत तारांची दुरुस्ती करण्याचे काम वेगाने सुरू आहे. महावितरणकडून मिळालेल्या माहितीनुसार, विजपुरवठा पूर्ववत होण्यासाठी किमान एका तासाचा कालावधी लागणार आहे.

वीज खंडित झाल्यामुळे घरगुती वापरकर्त्यांना स्वयंपाकापासून पाणीपुरवठ्यापर्यंत अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसेच व्यावसायिक व्यवहार ठप्प झाले असून, विद्यार्थ्यांच्या अभ्यासातही अडथळा येत आहे.

दरम्यान, महावितरणने नागरिकांना संयम बाळगण्याचे आवाहन केले असून, काम पूर्ण होताच वीजपुरवठा पूर्ववत केला जाईल, असे आश्वासन दिले आहे. नागरिक मात्र उष्णतेच्या दिवसात वीज गेल्याने प्रचंड गैरसोयीला सामोरे जात आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# अरविंद वाळेकर वरील हल्लेखोर १४ वर्षांनी जेरबंद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : नोव्हेंबर, २३, २०११ रोजी रात्री ९:३० वाजता अंबरनाथ शिवसेना शाखाप्रमुख अरविंद वाळेकर यांच्यावर शिवसेना शाखेत झालेल्या गोळीबाराच्या घटनेतील मुख्य आरोपी भैयाजी उर्फ राजेश रामशिरोमणी शुक्ला, वय ५१, याला अंबरनाथ पोलिसांनी तब्बल १४ वर्षांनंतर पकडून बेड्या ठोकल्या आहेत. भैय्याजी हा मूळचा उत्तर प्रदेश सुलतानपूर जिल्ह्यातील सुकुलपूर गावचा रहिवासी आहे. या घटनेनंतर तो गुजरात मधील सुरत मध्ये लपून बसला होता. ठाणे गुन्हे शाखेने मंगळवारी सुरत शहरातून त्याला अटक केली.या घटनेत दोन अज्ञात व्यक्तींनी शिवसेना शाखेत घुसून अरविंद वाळेकर यांच्यावर रिव्हॉल्व्हरने अंदाधुंद गोळीबार केला होता. या अनपेक्षित हल्ल्यात अरविंद वाळेकर यांचे अंगरक्षक श्यामसुंदर यादव यांचा मृत्यू झाला. या हल्ल्यात अरविंद यांच्या रक्षणासाठी वाळेकरांचा अंगरक्षक राकेश यादव यांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात भैय्याजीचा हस्तक मनिष कुमार उर्फ बबलू झा शर्मा हा मारला गेला होता. वाळेकर यांच्या तक्रारीवरून २४ नोव्हेंबर २०११ रोजी दुपारी १२:३० वाजता अंबरनाथ (पूर्व) येथील शिवाजी नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींच्या मोबाईल नंबरचे तांत्रिक विश्लेषण केल्यानंतर आणि गोपनीय माहिती देणाऱ्यां च्या मदतीने, केंद्रीय गुन्हे अन्वेषण कक्षाचे दादासाहेब पाटील यांना आरोपी सुरत जिल्ह्यातील पलसाणा येथे राहत असल्याचे आढळून आले. तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील पोलिस पथक गुजरातला रवाना झाले. आणि, १६ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३:३५ वाजता स्थानिक पोलिसांच्या मदतीने पवन शुक्लाला सुरत मधील पलसाणा चौकातून ताब्यात घेतले. वैद्यकीय तपासणीनंतर त्याला आता अंबरनाथ पूर्वेतील शिवाजीनगर पोलिस ठाण्यात हजर करण्यात आले. गुन्हे अन्वेषण कक्षाचे प्रमुख पोलिस निरीक्षक विजय कुमार देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सुरेश मालोदे, दिनकर सावंत, अंकुश शिंदे आणि मयूर शिरसाट यांच्या पथकाने ही एकत्रित कारवाई केली.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024